(SJIF)Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October - 2020

SPECIAL ISSUE-CCXLVII ( 247)

# Ideology of Mahatma Gandhi

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Gest Editor:
Dr. R.K.Ippar
Principal
Vaidyanath College Parli- Vaijnath,
Dist. Beed.

Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Prof.(Dr.) V.B. Gaikwad
P.G. Coordinator, Science

Executive Editor:
Jawahar Education Society's Vaidyanath College Parli- Vaijnath,
Dist. Beed.

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 247
ISSN : 2278-9308
October,2020

# भगवद्‌गीता व महात्मा गांधी

प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव
(इतिहास विभाग प्रमुख) बलभीम महाविद्यालय, बीड

<u>प्रस्तावना :-</u> जगाच्या पाठीवर अस्तित्वात असलेल्या अनेक देशामध्ये पारतंत्र्य आणि स्वातंत्र्य या प्रश्नावरून चळवळी उभ्या राहिलेल्या होत्या. उभारलेल्या चळवळी समर्थपणे पुढे चालू ठेवण्यासाठी जगातील वेगवेगळ्या देशात वेगवेगळे समाजसुधारक, तत्वज्ञ, विचारवंत उदयास आले होते. त्याप्रमाणे भारतात सुध्दा अनेक समाजसुधारक भारतीय स्वातंत्र्यसाठी उभारलेल्या चळवळीत सहभागी होऊन नेतृत्व करीत होते. त्या नेत्यांच्या नावांचा उल्लेख या शोधनिबंधाता करणे शक्य नाही. परंतू महात्मा गांधीचा मात्र उल्लेख करावा लागेल. कारण भारतीय स्वातंत्र्य चळवळीत गांधीचे स्थान अत्यंत महत्वाचे होते. गांधीनी आपल्या जीवनात ज्या घडामोडी घडवून आणल्या त्या सर्व समाज आणि देश हिताच्याच होत्या हे सर्वज्ञात आहे. जहाल कालखंडाचे नेतृत्व करणारे लोकमान्य टिळक यांचे १९२० मध्ये निधन झाल्यानंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधीजीकडे आले. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढा हा महात्मा गांधीच्या व्यक्तीमत्वास व कार्याभोवती केंद्रीत झाल्याचे सर्व जगाने पाहिले आहे. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील गांधीजी ही एकमेव व्यक्ती आहे की , जिचे नाव संपूर्ण भारतात व जगतातील सर्व जनतेपर्यंत जाऊन पोहचले होते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू आहेत. स्वातंत्र्ययोध्दे, समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, राजकीय, विचारवंत, अस्पृश्योध्दारक धर्मवक्ते, अर्थतज्ञ इत्यादी त्यांनी सत्याग्रहाच्या माध्यमातून ब्रिटिश राजवटीच्या विरोधात अहिंसक मार्गाने उभारलेला लढा हा देशाच्या इतिहासातील अभूतपूर्व घटना मानावी लागेल. या संदर्भात निर्मलकुमार बोस म्हणतात, भारतीय राजकारणात गांधीचा अवतार झाला नसता तर सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे तरूण वळले असते यात शंका नाही. तसेच गोपाळकृष्ण गोखले म्हणतात, जी माणसे गांधीजीच्या सहवासात येतात त्यांनाच त्यांच्या व्यक्तीमत्वाची थोरवी कळून येते अशा या महान सुधारकाने देशातील जनतेसाठी तर काम केलेच परंतू आध्यात्मा विषयी सुध्दा जागृती करण्यासाठी भगवद्‌गीतेचा आधार घेवून त्यामध्ये जे सार दडले होते ते समाजासमोर ठेवण्याचे केलेले कार्य या शोध निबंधात नमूद करावयाचे आहे ते खालील प्रमाणे असेल.

महात्मा गांधीनी अनेक देशांचा प्रवास केला होता आणि वास्तव्य पण केले होते. त्याप्रमाणे त्यांचे लंडनमध्ये वास्तव्य होते. लंडनमधील बेकॉटर परिसरात राहात असताना गांधीजीनी तेथील शाकाहारी लोकांची एक संघटना स्थापन केली व त्या संघटनेचे ते सेक्रेटरी झाले. 'दि व्हेजिटेरियन' या वृत्तपत्राचे संपादक डॉ. जेशिया ओल्डफील्ड या दाढीदिक्षिताची अध्यक्ष तर सर एड्विन आर्नल्ड यांची उपाध्यक्ष म्हणून निवड केली. परंतू गांधीची भेट घेण्यापूर्वीच काही वर्षे आधी, सर एड्विन यांनी "स्वर्गीय गीता" नावाचे भगवद्‌गीतेचे इंग्रजी भाषांतर करून ते १८८५ मध्ये प्रसिध्द केले होते. गांधीजी लंडन मध्ये एल.एल.बी. च्या दुसऱ्या वर्षात असताना त्यांनी एड्विन आर्नल्ड यांच्या इंग्रजी भांषातराची पहिल्यांदाच गीता वाचली. इस्लामी नागरीकांना जसे कुराण किंवा यहूदी लोकांना "जुना करार" वा ख्रिश्चन लोकांना "नवा करार" जसा पवित्र वाटतो तशीच हिंदू लोकांना गिता पवित्र वाटते. आपण वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत गिता वाचली नाही याची गांधींना खंत वाटत असे. या नंतरच्या काळात मात्र गांधीनी संस्कृतीमधील मूळ गीता व त्याची अनेक भाषांतरे वाचली. त्यांची संस्कृत भाषा फार चांगली नसली तरी त्यांनी होणाऱ्या टिकेचा स्विकार करून गीतेचे गुजराथीत भाषांतर केले. त्यांच्या त्या अनुवादीत पुस्तकाचे महादेव देसाईनी पुढे इंग्रजीत भाषांतर केले.

भगवद्‌गीता म्हणजे स्वर्गामध्ये इश्वराने गायिलेले गीत; त्यामुळे महात्मा गांधीचे तर ते पवित्र श्रध्दास्थान होते मी जेंव्हा अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडतो. विकल्प भावनेने ग्रस्त होतो आणि क्षितीजावर आशेचा एक ही किरण दिसत नाही. अशावेळी मी भगवद्‌गीतेकडे वळतो. त्यावेळी ती मला दिलासा देते व अतीव दुःखातून मी हसतमुखाने बाहेर पडतो, असे गांधीनी ६ ऑगस्ट १९२५ च्या 'यंग इंडिया' च्या अंकात म्हटले होते. माझे जीवन अनेक बाह्य घटनांनी व्यापले आहे, तथापि त्यांचा माझ्यावर कायमचा असा ठसा उमटलेला नाही. त्या सर्व गोष्टीचे श्रेय हे गीतेतील शिकवणुकीला आहे असे गांधीजी म्हणतात. त्यामुळे गांधीजीच्या जिवनातील प्रत्येक क्षण हा गीतेने दिलेल्या संदेशाप्रमाणे अंतःकरणपासून मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न होता असे महादेव देसाईनी नंतरच्या काळात लिहीले.